# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबईउपनगर

नविन प्रशासकीय ईमारत, 4था मजला, आर.सी.चेंबुरकर मार्ग, चेंबुर, मुंबई 400071
दुरध्वनी 022-25222023 ईमेल asstccmsj.mumbaisuburb@maharashtra.gov.in


जाक/सआसक/मुउ/भासशि/17-18/ दि. /11/2017

प्रति,

---------------------------

---------------------------

---------------------------

विषय – महाडीबीटी पोर्टल वर सामाजिक न्याय व विशेष् सहाय्य विभागाच्या विविध योजना करीता विदयार्थ्यांच्या नोंदणी करण्याबाबत.

संदर्भ – क्र.सकआ/शिक्षण/डीबीटी पोर्टल/प्रसिध्दी/2017-18/3031, दि.01.11.17

संदर्भीय विषयान्वये आपणास विदीतच आहे की, महाराष्ट्र शासनाने 3 ऑगस्ट 2017 पासून सर्व प्रकारच्या शिष्यवृत्या/शिक्षण फी व परीक्षा फी/निर्वाह भत्ता/विदयावेतन इ. साठी महाडीबीटी पोर्टल कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. प्रत्येक वर्षी महाराष्ट्र राज्यात 17 लाख विदयार्थी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती करीता अर्ज करतात. परंतु महाडिबीटी पोर्टल् वर फक्त 76000 विदयार्थ्यांनी अदयापपर्यत् नोंदणी केलेली आहे. ही अत्यंत खेदजनक बाब आहे. तरी महाडीबीटी पोर्टलवर जास्तीत जास्त विदयार्थ्यांनी नोंदणी करण्यासाठी खालील प्रमाणे दिलेल्या सूचनांचे पालन करावे.

## डीबीटी पोर्टल वर नोंदणी करण्यासाठी विदयार्थ्यांना दयावयाच्या सुचना

अ) .ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी पुर्वतयारी :-

1. विदयार्थ्यांनी आपला आधार क्रमांक काढणे आवश्यक आहे.
2. विदयार्थ्याने कोअर बॅकींची सुविधा असलेल्या बॅकेतच बॅक खाते उघडणे आवश्यक आहे.
3. विदयार्थ्याने आपला जातीचा दाखला, जात पडताळणी दाखला, 10 वी 12 वी ची मार्कशीट, व मागील परीक्षा उत्तीर्ण दाखला व गुणपत्रीका, जन्मदाखला पुरावा, रहिवास दाखला ( डोमीसाईल), उत्पन दाखला,, प्रवेशित महाविदयालयाची माहिती, प्रवेशित अभ्यासक्रमाची माहिती, अभ्यासक्रम कालावधी, बॅक पासबुकाची झेरॉक्स , आधार कार्ड, दिव्यांग असल्यास दिव्यांगाचा दाखला, शिधापत्रिका इ. कागदपत्रे तयार ठेवावीत.

ब. महाडिबीटी पोर्टल वर नोंदणी कशी करावी :-

1. आपण कोणत्याही ब्राउझर चा वापर करु शकता (उदा. Internet Explorer (I.E.)/Google Chrome/Mozilla firefox etc. (
2. https://mahadbt.gov.in या बेवसाईट वर जाउन नवीन नोंदणी या बटणावर क्लिक करावे
3. प्रत्येक विदयार्थ्याने म्हणजेच ज्या विदयार्थ्यांनी या पुर्वी e scholarship पोर्टलवर नोंदणी केली आहे. त्यांनी सुध्दा mahaDBT पोर्टल वर नोंदणी करणे आवश्यक आहे. आधार

कार्डचा वापर करुन नोंदणी करावी आधार आहे ?" असेल तर होय व नसेल तर नाही वर क्लिक करा.

4. त्यांनतर "OTP" हा पर्याय निवडा.
5. वैध आधार क्रमांक टाकल्यावर "OTP" पाठवा बटणा वर क्लिक करा.
6. मोबाईल क्रमांकावर प्राप्त झालेला "OTP" )One time password ( टाकून पडताळणी बटणावर क्लिक करावे.
7. उपलब्ध विडोंमध्ये नाव,जन्म दिनांक, फोन नंबर , पत्ता, आधार संलग्न बॅक खाते नंबर इ. आधार कार्डवरील माहिती आपोआप दिसेल.
8. आधार कार्ड नसल्यास आधार कार्ड नाही हा पर्याय निवडावा व आवश्यक ती माहिती भरावी व कागदपत्रे अपलोड करावीत.
9. नोंदणी अर्जांच्या विंडोमधील सर्व माहिती भरावी.
10. स्वत:चा युजरनेम व पासवार्ड तयार करावा.

क . अर्ज कसा भरावा

1. महाडीबीटी पोर्टलवर लॉगीन करण्यासाठी सिलेक्ट युजरमध्ये जावून विदयार्थी हा पर्याय निवडावा.
2. युजरनेम व पासवर्ड टाकून लॉगीन व्हा.
3. लॉगीन झाल्यानंतर विंडोमधील योजना तपशील यावर क्लिक करा. त्यांनतर आपण् विभागवार योजना आपण पाहू व निवडू शकाल.
4. आपणास ज्या योजनेसाठी अर्ज करावयाचा आहे त्या योजनेच्या नावासमोर पहा क्लिक केले असता योजनेची सपूर्ण माहिती मिळू शकेल.
5. त्यांनतर कोणत्या योजना (मॅट्रीकपुर्व/ मॅट्रीकोत्तर) साठी आपण पात्र आहोत याची खात्री करा व पर्याय वर क्लिक करा (उदा. शालेय विदयार्थ्यांना मॅट्रीकपुर्व व महाविदयालयीन विदयार्थ्यांना मॅट्रीकोत्तर हा पर्याय निवडावा)
6. आवश्यक ती सर्व महिती उदा. जात, प्रवर्ग, महाराष्ट्राचा रहिवासी, अपंगत्व , कौटुंबिक उत्पन्न इ माहिती काळजीपुर्वक भरा.
7. पालकांची माहिती, शाळा/महाविदयालयाचा तपशील नमूद करावा.
8. आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करावीत उदा. रहिवास दाखला, उत्पन्न दाखला, एसएससी व एचएससी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र , जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, बॅक खाते क्रमांक, आधार क्रमांक इ.
9. विदयार्थी/पालकांना काही अडचणी असल्यास त्यांनी 18001025311या टोल फ्री क्रमांकावर किंवा helpdesk@mahadbt.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क साधावा.

ड . महाविदयालयासाठी सूचना

1. महाडिबीटी पोर्टलवर विदयार्थ्यांना ऑनलाईन नोंदणी व अर्ज करण्यासाठी सहकार्य करावे.
2. SC/OBC/VJNT/SBC विदयार्थ्यांकडून प्रवेश घेतेवेळी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कांची रक्कम घेवू नये.
3. विदयार्थ्यांना आधार कार्ड , कोअर बॅकींगची सुविधा असलेल्या बॅकेत बॅक खाते काढणे तसेच आधार क्रमांक मोबाईल क्रमांकाशी व बॅक खात्यांशी जोडूनी करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

4. आपल्या महाविदयालयाचे नाव , महाविदयालयास मान्य असलेल्या अभ्यासक्रमाची नांवे, अभ्याक्रमांचा कालावधी, अभ्याक्रमनिहाय प्रवेश क्षमता, महाविदयालयाच्या व अभ्यासक्रमांच्या मान्यतेचे विविध आदेश याबावतची माहिती पोर्टलवर मॅप करण्यासाठी आपआपल्या आयुक्तालयास/संचालनालयास/विदयापीठास/परिषदेस सादर करुन मॅप करण्याची कार्यवाही करावी.
5. महाविदयालय,. त्यांचा अभ्यासक्रम, त्यांची प्रवेश क्षमता, अभ्यासक्रमाचा कालावधी, शुल्क रचना माहिती पोर्टलमध्ये समावेश (मॅप) करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविदयालयाची असेल. यासाठी ज्या प्राधिकाऱ्यांनी )Authority ( मान्यता दिली आहे त्यांच्याशी संपर्क साधावा.
6. दि.09.10.2017 च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे. तसेच Online पध्दतीने mahadbt.gov.in या प्रणालीवर देण्यात आलेल्या नविन संस्था नोंदणी या विभागात ज्या महाविदयालयाचे अभ्यासक्रम मॅप झाले नसतील त्यांनी महिती अदयावत करावी

सहाय्यक आयुक्त समाज कल्याण
मुंबई उपनगर